महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES
म्हसरुळ, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२ ००४
Mhasrul, Dindori Road, Nashik – 422 004.
**Phone:** 0253-2539175 / **EPABX:** 0253-2539100 - 300 / **Fax:** 0253-2539176
**E-mail:** pro@muhsnashik.com / **Web:** www.muhsnashik.com

क्र. मआविवि/पीआर/४८८/२०११ दि.२८ एप्रिल २०११

वृत्त प्रसिध्दीसाठी

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे "स्पंदन" महोत्सवाचे उद्‌घाटन.

# संस्कृती टिकली तरच सशक्त समाजाची निर्मिती

**- मकरंद अनासपुरे**

**मिरज (दि.२८)** – आपली प्राचीन संस्कृती आणि परंपरा मोठी असून ती कायम राखली तरच भविष्यातील सशक्त समाजाची निर्मिती होऊ शकेल असे प्रतिपादन सुप्रसिध्द चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा पाचव्या "स्पंदन - २०११" या राज्यस्तरीय महोत्सवाचे उद्‌घाटन मिरज येथील बालगंधर्व नाटय मंदिरात उत्साहात संपन्न झाले.

या महोत्सवास उद्‌घाटक म्हणुन प्रमुख अतिथी सुप्रसिध्द चित्रपट अभिनेते मकरंद अनासपुरे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.अरुण जामकर उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार श्री.खाडे, डॉ.गजानन एकबोटे, श्री.राजेश पांडे, डॉ.राजदेरकर, डॉ. राजेंद्र मेथे, डॉ.अरुण भस्मे, डॉ.मालोकर, डॉ.चिंते, डॉ.गायकवाड, डॉ.मनिषा कोठेकर, डॉ.सोमवंशी, प्रा.बी.व्ही.कापडणीस, श्री.पृथ्वीराज पाटील, श्री.संजय मेंढे, श्री.स्वप्नील तोरणे आदी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या उद्‌घाटक मनोगतात मकरंद अनासपुरे म्हणाले की, आरोग्य विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्याचे महत्वाचे कार्य या स्पंदन महोत्सवाच्या निमित्ताने होत आहे. विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांसाठी अनेक उत्तम उपक्रम घेतले जातात, असे असले तरी विद्यार्थ्यांनी या गोष्टींचे भान ठेवले पाहिजे. तारुण्याचे दिवस हे आयुष्याचे मोलाचे दिवस असतात. यात आयुष्य घडतेही आणि बिघडतेही. विशिष्ट ध्येय ठेवून कार्यरत राहिले तरच उद्याचा सशक्त समाज तयार होऊ शकेल. ते पुढे म्हणाले की, पडद्यावर जरी नायकाची भुमिका साकारत असलो तरी आम्ही कचकडयाचे नायक असतो. तुम्हा तरुणांनी समाजातील खरे नायक असलेले डॉ.प्रकाश आमटे, डॉ.अभय बंग, सिंधुताई सपकाळ यांच्यासारख्यांचा आदर्श घ्यावयास हवा व त्या दिशेने आयुष्याची वाटचाल करावी.

विद्यापीठाचे कुलगुरु मा.डॉ. अरुण जामकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आजच्या धावपळीच्या जगात ताणतणाव मोठया प्रमाणावर वाढले आहे. डॉक्टरांच्या दैनंदिन आयुष्यात ताणतणाव अधिक असतात. ताणतणावावर केवळ छंद, कलागुण जोपासले तरच मुक्तता होऊ शकते. म्हणुनच या स्पंदन सारख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून आरोग्य विद्यापीठ कार्यरत आहे. या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थी अभिनय, गायन, वादन अशा क्षेत्रांमध्ये मोठया स्थानावर पोहोचले आहे. महाराष्ट्रातला कॉमेडीचा नवा सुपर स्टार डॉ.नितीन साबळे हा विद्यार्थी स्पंदन सारखे व्यासपीठ मिळाल्यामुळेच घडला हे या उपक्रमाचे यश आहे असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, मिरज-सांगली हे केवळ आरोग्य पंढरीच नव्हे तर कलेची पंढरीदेखील आहे. वादनापासून गायकीपर्यंत अनेक दिग्गज कलावंतांचे वास्तव्य या नगरीत राहिले आहे. स्व.बालगंधर्वांनी ज्या कलामंदिराच्या व्यासपीठावरुन आपली कला सादर केली त्याच व्यासपीठावरुन आज आरोग्य विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना कला सादर करावयास मिळते आहे असे त्यांनी सांगितले.

मिरजचे आमदार मा.सुरेशजी खाडे यांनी विद्यापीठाच्या स्पंदनचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, सर्वसामान्य माणूस डॉक्टरलाच परमेश्वराच्या जागी मानतो या गोष्टीचे भान विद्यार्थ्यांनी कायम राहू द्यावे असे सांगितले.

स्पंदनचे कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे हे आपल्या मनोगत व्यक्त करतांना म्हणाले की, संपूर्ण राज्य स्तरावरील वेगवेगळया पॅथीज्च्या विद्यार्थ्यांना एकत्र आणून स्पंदन सारखा मोठा उपक्रम करणे हे शिवधनुष्य पेलण्यासारखेच कार्य आहे. मात्र सर्वांच्या सहकार्यावरुन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याचा हा उपक्रम यशस्वीपणे साजरा केला जातो असे सांगितले. स्पंदनचे सरचिटणीस श्री.राजेश पांडे यांनी सांगितले की, कुलगुरु डॉ.जामकर यांनी विद्यार्थी देवो भव ही संकल्पना रुजवण्याचे मोलाचे कार्य हाती घेतले आहे. या सर्व प्रयत्नातून अनेक विविध उपक्रम साकारले जात आहे. विद्यापीठाच्या या पाचव्या स्पंदनची भव्यता हा याचाच परिपाक आहे असे सांगितले. डॉ.शेखर राजदेरकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर अधिसभा सदस्य डॉ.राजेंद्र मेथे यांनी आभार प्रदर्शन केले.

या कार्यक्रमास मोठया संख्येने विद्यार्थीवर्ग, शिक्षकवृंद उपस्थित होता. दि.२९ व ३० एप्रिल रोजी संगीत, नृत्य, साहित्य, नाटय व ललित या पाच मुख्य कला प्रकारांमधील २६ विविध उपकला प्रकारांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१ मे रोजी स्पंदन या कार्यक्रमाच्या समारोप व बक्षिस वितरण समारंभ संपन्न होणार आहे. याप्रसंगी वने, मदत व पुनर्वसन मंत्री मा.ना.डॉ.पतंगरावजी कदम, प्रसिध्द चित्रपट अभिनेत्री कु.अमृता खानविलकर, सांगलीचे जिल्हाधिकारी श्री.श्याम वर्धन, सांगलीचे जिल्हा पोलिस प्रमुख डॉ.रविंद्र शिसवे आदी उपस्थित राहणार आहे.

कुलसचिव

मा. संपादक,
सदर वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्यांमधून प्रसिध्द करावे ही विनंती.

Sd /-
(स्वप्नील तोरणे)
जनसंपर्क अधिकारी


आरोग्य विज्ञान विद्यापीठ,
राज्यस्तरीय सांस्कृतीक
युवा महोत्सव